**लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि., ज्ञानेश्वरनगर**
**पो. भेंडे साखर कारखाना, ता. नेवासा, जि. अहमदनगर**

जा. क्र. एफ/अेजीआय/५०/९८/ 3510 दिनांक :- 29 MAY 2020

## टेंडर नोटीस

विषय:- ऊस वाहतुकीवरील बैल टायरगाडया व इंजिन ट्रॅक्टर टायरगाडयांचे दुरूस्ती व त्या अनुषंगाने येणारे रिपेरिंगचे कामे टेंडर पध्दतीने देणे बाबत.

महाशय,

गळीत हंगाम २०२०-२१ करीता आमचे कारखाना मालकिचे ऊस वाहतुकीवरील ७४६ टायरबैलगाडया व २५० इंजिन ट्रॅक्टर टायरगाडयाचे ऑफसिझन व सिझनची कामे सुरवातीपासूनची दुरूस्ती पंचर मेंटनन्स व सिझन संपल्यानंतर जमा करणेपर्यतचे सर्व कामे टेंडर पध्दतीने खालील कामाचे तपशिलाप्रमाणे द्यावयाची आहे. तरी इच्छुक कंत्राटदारांनी दिनांक०९ /०६/२०२० पर्यत सुटटीचा दिवस सोडून बंद पाकिटात टेंडर भरून द्यावेत.

**//कामाचा तपशिल//**

अ) गळीत हंगाम सुरूवातीला टायरगाडया दुरूस्ती करून वाटप करणेपासून गळीत हंगामात वाहतुकदारांचे मागणीनूसार टायरगाडया विनातक्रार रिपेरिंग करून देणे स्वत:चे वाहनाने प्लॉटवर जावून पंक्चर काढणे पासून ते इतर दुरूस्तीचे कामे करणे. हंगाम बंद झाल्यानंतर टायरगाडया जमा करणे पर्यतची कामे करून देणे.

१) गाळप हंगाम बंद झाल्यानंतर सर्व टायरगाडया एकत्रीत करून त्यांचे टायर व्हील डिक्ससह खोलुन गाडया व्यवस्थित लावणे.

२) टायर व्हिलस् (स्टेपनी) व्यवस्थीत थप्पी मारून कारखान्याकडून ताडपत्री घेवून स्टेपन्या व्यवस्थित झाकुन ठेवणे (कारखाना सांगेल त्या ठिकाणी)

३) ऑफ सिझनमध्ये गाळप हंगाम सूरु होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर सर्व टायरगाडया पूर्णपणे दुरूस्ती करून ठेवणेत यावी (ग्रिसिंगकरणे नंबरींग करून कारखाना ट्रेड मार्क देणे धुरी पाईप व चॅनल बॉक्स तयार करून फिटींग करणे मोड-तोड असेल त्या ठिकाणी वेल्डिंग करून जोड देणे,निघालेल्या प्लेट बसवणे स्टेपनी पंक्चर असेल तर पंक्चर काढून स्टेपनी फिटींग करणे खराब झालेले नटबोल्ट, वायसर, ॲक्सल, हब व इतर सर्व कामे करणे.)

४) टायरगाडीला दोन्ही बाजूस रेडीयम पटटी लावून सिरियल नंबर व कारखाना ट्रेड मार्क टाकणे.

५) गळीत हंगाम चालू असताना टायर पंक्चर करिता दोन वाहने व फिटर कंत्राटदारांचे राहतील टायरगाडी ज्या प्लॉटवर पंक्चर आहे अगर इतर घोटाळा झाला आहे त्या ठिकाणी जावून सदर दुरूस्तीचे कामे करावी लागतील (स्वत:चे वाहनाने)

६) स्टेपनी पंक्चर व इतर दुरुस्ती करीता लागणारी मशनरी आणि टुल्स उदा- (वेल्डिंग मशिन, पंक्चर मशिन , व कॉप्रेशर मशिन गॅस कटर सेट पान्हे व जॅक इ.) कंत्राटदाराचे राहील. त्यांना जागेची व लाईटची व्यवस्था कारखाना साईटवर कारखान्यामार्फत मोफत दिली जाईल.

७) सदर दुरूस्ती कामाचे बील दरमहा अदा केले जाईल, व बिलाधून १०% डिपॉझीट रक्कम कपात करून ठेवणेत येईल. सदर डिपॉझिट रक्कम गळीत हंगाम बंद झालेनंतर अनं. १ व २ प्रमाणे काम झालेनंतरच अदा केली जाईल गळीत हंगाम चालू असताना मध्येच काम सोडून दिल्यास कारखाना आकारील तो दंड भरावा लागेल व डिपॉझिट रक्कम जप्त केले जाईल.

८) रु. ५००/- चा स्टॅम्प पेपरवर नियमाप्रमाणे करारा नामा करून द्यावा लागेल.

९) दुरूस्तीकरीता लागणारे सहित्य उदा- वेल्डिंग रॉड, ॲगल, चॅनल, प्लेट, पाईप बेरिंग, टायर, टयुब, नटबोल्ट, वायसर, ॲक्सल, हब, डिक्ससह इतर स्पेअरपार्टचा पुरवठा कारखान्यामार्फत केला जाईल.तसेच पंक्चर दुरस्ती साठी लागणाऱ्या वस्तु उदा- रबर, पॅच, वालशिट, सोल्युशन कारखान्यामार्फत दिले जाईल. तसेच गेटर साठी खराब टायर दिले जाईल सदर टायर कंत्राटदारांमार्फत कटाई करून गेटर तयार करावे लागेल.

Scanned with CamScanner

१०) कामात येणारे जुने मटेरियल वगळता इतर बदलेले सर्व खराब मटेरियल (जे कामात येणार नाही असे) स्टोअर विभागात संबंधीत अधिकारी सांगतील त्या ठिकाणी निवड करून व्यवस्थित थप्पी लावून ठेवावे लागेल.

११) आपले कामावर देखरेख करणे करिता शेतकी विभागाचे दोन प्रतिनिधी राहतील

**//शर्ती व अटी//**

१) कंत्राटदाराने कारखान्याचे क वर्ग सभासद व्हावे लागेल त्यासाठी कारखान्याची नाममात्र सभासद फी रू. १००/- भरणा करावी लागेल.

२) पंक्चर व इतर कामासाठी स्वतःचे मजुर, वाहन ,मशिनरी ,व इतर हत्यारे ठेवावी लागेल.

३) टायरगाडी ऊस आणत असताना गटामध्ये अथवा वाटेत कोठेही पंक्चर अगर इतर काही घोटाळा झाल्यास दुरूस्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यासाठी कारखाना वाहण उपलब्ध करून देणार नाही.पर्यायी भाडोत्री वाहण उपलब्ध करावे.

४) कामाचा कालावधी वार्षिक राहील कामाची वेळ २४ तास राहील.(तीन पाळीत)

५) शेतकी विभागाच्या शिफारशीनुसार दर महा बिलाचे पेमेंट १०% रक्कम डिपॉझीट कपात करून अदा केले जाईल.

६) काम करत असताना काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जाबाबदरी कंत्राटदाराची राहील. कारखाना कुठल्याही प्रकारची झळ सहन करणार नाही.

७) तुमचे काम समाधान कारक न झाल्यास केव्हाही काम काढून घेण्याचा अधिकार संस्थेस राहील. व तुमची सुरक्षा अनामत डिपॉझीट रक्कम जप्त करणेत येईल.

८) वरील शर्ती व अटी व्यतीरिक्त कामाचे स्वरूपानूसार शर्ती व अटीत बदल करण्याचा अधिकार कारखान्यास राहील.

९) गटामध्ये अथवा रस्त्याने जाता-येता गाडी पूर्ण पणे निकामी झाल्यास स्वतःच्या वाहनाने गाडी कारखाना साईटवर पोहच करावी लागेल.

१०) मजुरांचा विमा काढणेची जबाबदरी कंत्राटदाराची राहील.

११) सदर कामाची ऑर्डर मिळाले नंतर त्वरीत रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल.

१२) सिझनमध्ये अगर कारखाना बंद झाल्यावर टायरगाडीचे स्पेअर पार्टस (स्टेपनी, समांतर अँगल व इतर पार्ट) बदली होणार नाही. याची दक्षता घ्यावी लागेल.

कळावे

आपला विश्वासू

( अनिल पं. शेवाळे )
कार्यकारी संचालक

Scanned with CamScanner